कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील श्री. दिलीप ना. गुंड यांच्या “मुख्य अग्निशमन अधिकारी” या पदावरील नेमणुकीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-<u>४५ (४) नुसार मान्यता</u> <u>देण्याबाबत</u>.

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः- कडोंम-१०१८/प्र.क्र.१४५/नवि-२८

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

४ था मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांकः- ११ जुलै, २०१९

<u>संदर्भ</u>:- १) शासन निर्णय क्र. संकिर्ण-१००५/वर्गीकरण/प्र.क्र.३७९/नवि-२४, दि. ०४.०५.२००६.

२) शासन निर्णय क्र.कडोंमपा-१००६/१७०८/प्र.क्र.१२५/०७/नवि-२८, दि.२४.०६.२००७.

३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.७४, दि.१९.१०.२०१८.

४) आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचे पत्र क्र.कडोंमपा/साप्र/टे.नं.९/१४३१, दि.०३.११.२०१८.

<u>प्रस्तावना</u>:-

आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील अधिकारी श्री. दिलीप ना. गुंड, यांच्या “मुख्य अग्निशमन अधिकारी” या शासन मंजूर पदावरील नेमणुकीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५ (४) अन्वये शासन मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भीय दि.०३.११.२०१८ च्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे.

२. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका अग्निशमन सेवेकरीता शासन निर्णय दि. ४.०५.२००६ अन्वये आकृतीबंधास मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात सदंर्भीय दि. २४.०६.२००७ अन्वये “मुख्य अग्निशमन अधिकारी” हे एक पद निर्माण करण्यात आले आहे.

३. श्री. दिलीप ना. गुंड, यांच्या “मुख्य अग्निशमन अधिकारी” या पदावर पदोन्नती देण्याबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सर्वसाधारण सभा दि.१९.१०.२०१८, ठराव क्र.७४ अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने उक्त अधिकाऱ्यांच्या “मुख्य अग्निशमन अधिकारी” या पदावरील नेमणुकीस शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>:-

आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचेकडून संदर्भीय पत्रांन्वये प्राप्त प्रस्ताव व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने दि.१९.१०.२०१८ रोजीच्या ठराव क्र.७४ अन्वये दिलेली मान्यता विचारात घेता, श्री. दिलीप ना. गुंड, यांच्या “मुख्य अग्निशमन अधिकारी” कल्याण-डोंबिवली महानगरपालिका या पदांवरील नेमणुकीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५ (४) अन्वये शासन मंजुरी देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१९०७१११४२९२१६५२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Navnath Ravaji Wath

Digitally signed by Navnath Ravaji Wath
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=885bfbac1d8ef74e3ffe622f226b31d75c2a13f319632f0da72fd54e57ac00ff, serialNumber=30e05bf6f1ed11d82b5689c9fc6b47a271a6b22790a9388dba7f3db15e247ff5, cn=Navnath Ravaji Wath
Date: 2019.07.23 11:49:20 +05'30'

(नवनाथ रा. वाठ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२) महापौर, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, जिल्हा-ठाणे.
३) आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, जिल्हा-ठाणे.
४) मा.राज्यमंत्री, (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५) प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) उप सचिव (नवि-२८), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७) निवडनस्ती (नवि-२८).